मुंबई वृत्तान्त
लोकसत्ता
बुधवार, २२ डिसेंबर २०१०

# सूरमयी रंगसंमेलन!



गोव्याच्या नितांतसुंदर निसर्गभूमीत दर्दी गोंयकार रसिकांच्या उपस्थितीत चतुरंग प्रतिष्ठानचे २० वे रंगसंमेलन गेल्या आठवड्यात मोठ्या उत्साहात पार पडले. दहा वर्षांमागे गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्याकरता त्यांच्याच आग्रहास्तव गोव्यात रंगसंमेलन घेतलं गेलं होतं. त्या भव्यदिव्य सोहळ्याच्या रंगीतसंगीत आठवणी जागवत गोमंतकीय रसिक गोव्यात पुन्हा केव्हा रंगसंमेलन होणार, याची आतुरतेनं वाट पाहत होते. त्यांची ही इच्छा एवढी तीव्र होती, की या रंगसंमेलनाची संपूर्ण जबाबदारी शिरावर घेण्याची त्यांची तयारी होती. कुमार सरज्योतिषी, परेश जोशी इत्यादी गोव्यातील चतुरंगी मंडळींनी त्यासाठी 'चतुरंग'कडे तसा हट्टाग्रहच धरला होता! शेवटी त्यांच्या आग्रहाला होकार देऊन यंदाचं रंगसंमेलन गोव्यात घ्यायचं ठरलं. तशात योगायोगाची गोष्ट म्हणजे यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार संगीतज्ञ डॉ. अशोक दा. रानडे यांना जाहीर झालेला होता. गोवा या कला-संस्कृतीच्या माहेरघरी रंगसंमेलन होत असताना संगीत क्षेत्रातील अधिकारी व्यक्तीलाच पुन्हा एकदा जीवनगौरव पुरस्कार मिळावा, हा दुग्धशर्करा योग होता! त्यात आणखी गोवामुक्तीच्या सुवर्णमहोत्सवाचं कोंदण या संमेलनाला लाभलं होतं. हा औचित्यक्षण न साधते तर ते चतुरंगी कसले! त्यांनी यानिमित्तानं गोव्यातल्या पाच स्वातंत्र्यसैनिकांचा प्रातिनिधिक सत्कार योजून गोवामुक्ती सुवर्णमहोत्सवाच्या पूर्वसंध्येलाच या सेलिब्रेशनची सुरुवात केली.

या रंगसंमेलनाचं ठळकपणे जाणवलेलं वैशिष्ट्य म्हणजे त्यात संगीत कार्यक्रमांना दिलं गेलेलं महत्त्व! संमेलनाची सुरुवातच मुळी उगवत्या पिढीतील गायकांच्या नाट्यसंगीतानं झाली. लिट्ल चॅम्प गाजवलेला प्रथमेश लघाटे, 'अवघा रंग एकचि झाला' या नाटकाने प्रकाशझोतात आलेली पं. राम मराठे यांची नात स्वरांगी मराठे आणि गोव्यातील उगवती तरुण गायिका मुग्धा गावकर यांच्या या नाट्यसंगीत मैफिलीनं रसिकांची जी पकड घेतली, ती सबंध संमेलनभर नंतरही कायम राहिली. यानिमित्ताने पं. राम मराठे, विद्याधर गोखले, वसंतराव देशपांडे, पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या सांगीतिक आठवणी जागविल्या गेल्या. प्रथमेश लघाटेनं 'सुरत पिया की झिन बिसराए...' ज्या नजाकतीनं गायलं, त्यानं रसिक मंत्रमुग्धच झाले. त्यातल्या हरकती, ताना आणि नंतरचं समेवर येणं... सारंच विलक्षण! त्याच्यातला गायक स्वतंत्रपणे विचार करायला लागला आहे, हे त्यातून जाणवत होतं. तीच गोष्ट स्वरांगी मराठेची. तिनं 'हे सुरांनो, चंद्र व्हा', 'सोहम् हर डमरू बाजे', 'मी पुन्हा वनात निघेन हरिणीवाणी' ही गाणी तयारीनं पेश केली. प्रथमेशनं 'घेई छंद मकरंद', 'जय शंकरा गंगाधरा' आणि 'परवशता पाश दैवे' ही गाणी त्यातल्या भावासह श्रोत्यांपर्यंत पोहचविली. त्याच्या 'परवशता...'मध्ये मात्र मा. दीनानाथांचं धारदार रूप दिसलं नाही. मुग्धा गावकर हिनं गायलेली 'जा जाण वचना...' आणि 'या भवनातील गीत पुराणे' ही गाणी तिच्या गायनातील परिपक्वतेची साक्ष देणारी होती. निवेदिका भार्गवी चिरमुले यांनी या तरुण गायकांशी संवाद साधला. स्वरांगी आणि प्रथमेशच्या फेममुळे की काय कोण जाणे, परंतु बहुतेक प्रश्न या दोघांनाच विचारले गेले. मुग्धा गावकर मात्र काहीशी दुर्लक्षिली गेली. अर्थात तिचं गाणंच इतकं खणखणीत होतं, की त्याद्वारेच तिनं आपली सणसणीत ओळख पटवून दिली. या नाट्यसंगीत मैफिलीला संगीतज्ञ डॉ. अशोक रानडे हेही श्रोत्यांमध्ये उपस्थित होते. पण त्यांच्या उपस्थितीचं कोणतंही दडपण या गायकांवर नव्हतं. कदाचित त्यांचा संगीत क्षेत्रातील दबदबा या मंडळींच्या गावीही नसावा. अन्यथा त्याचं प्रतिबिंब त्यांच्या गाण्यात नक्कीच पडलं असतं. असो.

याच सोहळ्यात नागेश करमली, महाबळेश्वर नाईक, अल्वारू परेरा, दामोदर प्रभुदेसाई आणि लक्ष्मीबाई पैंगणकर या गोवामुक्ती लढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांचा ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरुण टिकेकर यांच्या हस्ते हृद्य सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी डॉ. यशवंत पाठक यांचं गोवामुक्ती संग्रामावरील व्याख्यान चांगलंच रंगलं. त्यातून अनेक विस्मृत स्वातंत्र्यसैनिकांच्या कहाण्यांना उजाळा मिळाला. डॉ. अरुण टिकेकर आपल्या इतिहासाचं विवेचन करताना म्हणाले की, 'आपल्याकडचा इतिहास हा नेत्यांचा इतिहास आहे. त्यात सनावळ्या किंवा राष्ट्रपुरुषांची चरित्रेच प्रामुख्याने आढळून येतात. सामान्यजनांचा त्यात उल्लेखही नसतो. आपल्याकडे मौखिक इतिहास लिहिला गेलेला नाही. स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतलेल्या सामान्यजनांच्या रोमहर्षक कहाण्या ऐकल्या तरच खरा स्वातंत्र्यलढा आपल्याला कळून येईल. त्यासाठी तळागाळातल्यांचा इतिहास लिहिला जायला हवा. नव्या इतिहासकारांनी हे काम अंगावर घेतले पाहिजे, तरच खराखुरा इतिहास आपल्यासमोर येईल.'

रात्रीच्या सत्रात संगीतकार-गायक श्रीधर फडके यांची

# लाइफ स्टाईल





'सुलश्री' ही भावगीतांची मैफल उत्तरोत्तर छान रंगत गेली. सुधीर फडके, ललिता फडके आणि श्रीधर फडके या एकाच घराण्यातील तिघा कलावंतांची सुमधुर भावगीतं या मैफिलीत श्रीधर फडके आणि गायिका शिल्पा पुणतांबेकर यांनी सादर केली. प्रत्येक गाण्यामागील आठवणी तसंच त्या गाण्यांतली खासीयत श्रीधर फडके यांनी रसील्या पद्धतीनं उलगडून दाखविली.

धनश्री लेले यांच्या रसाळ निवेदनानं मैफल अधिकच संस्मरणीय ठरली. 'ताने स्वर रंगवावा' या गाण्यात गायिका शिल्पा पुणतांबेकरांनी असे काही रंग भरले, की ज्याचं नाव ते! 'सखी मंद झाल्या तारका', 'धुंद येथ मी स्वैर झोकितो मद्याचे प्याले', 'धुंदी कळ्यांना, धुंदी फुलांना', 'तोच चंद्रमा नभात', 'दिवसामागुनि दिवस चालले', 'झाला महार पंढरीनाथ', 'कानडा राजा पंढरीचा', 'सांज ये गोकुळी', 'ओंकार स्वरूपा...' अशा एकाहून एक सरस भावगीतांच्या सूरमयी चांदण्यात रसिक अक्षरशः न्हाऊन निघाले.

दुसऱ्या दिवशी डॉ. अशोक दा. रानडे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्याचा हृदयस्पर्शी सोहळा पार पडला. तत्पूर्वी सुधीर गाडगीळ यांनी डॉ. रानडे यांची प्रकट मुलाखत घेतली. परंतु ही मुलाखत म्हणावी तितकी रंगली नाही.

डॉ. रानडे यांची जडणघडण, त्यांचा विविध क्षेत्रांकडचा ओढा, त्यांत त्यांनी आससून घेतलेला रस आणि त्यातून निरनिराळ्या गोष्टींच्या व्यासंगाचा त्यांना जडलेला छंद... हे सारं त्यातून आकळत गेलं. या मुलाखतीत डॉ. रानडे यांनी व्यक्त केलेली मतं व निरीक्षणं कुणालाही अंतर्मुख करणारी होती... 'संगीताचं व्याकरण हे शिकायचं आणि मागे सोडायचं असतं. ते डोक्यात ठेवून गायचं नसतं... अस्वस्थपणा येणं ही चांगल्या कलेची खूण होय... कुठलीही परंपरा काय आहे, हे आधी नीट समजून घ्या आणि मगच तिच्यावर फुल्या मारा... कलाकार पत्रकाराकडे खरं बोलत नाही, पण त्याच्याशी जर कुणी शिष्याच्या नात्यानं, कलेच्या चाहत्याच्या भूमिकेतून बोलू गेलं तर तो निश्चितपणे खुलतो आणि आपल्या कलेबद्दल भरभरून बोलतो... कार्यक्रमाच्या सूत्रसंचालकानं आधी 'आपला' आवाज काय आहे हे ओळखावं आणि मग त्यानं कुणाचीही नक्कल केली तरी परत 'स्वगृही' येणं त्याला नंतर सोपं जातं... हळू बोलण्याशी ध्वनिशास्त्रीय तत्त्व निगडित आहे. लोकांना कळावं म्हणून तर आपण बोलतो. संथ बोलण्याने तुम्हाला जे म्हणायचंय ते त्यांच्यापर्यंत नीटपणे पोहचतं... संस्कृतीची व्यापक जाणीव मला एनसीपीएमध्ये मिळत होती. ती मिळायची जेव्हा थांबली, तेव्हा मी एनसीपीए सोडण्याचा निर्णय घेतला...' डॉ. रानडे यांच्या या सुस्पष्ट मत-मतांतरांमागे त्यांचं प्रदीर्घ अनुभवसंचित असल्यानं त्यांचं मोल नक्कीच मोठं आहे. संगीतावरील त्यांचं हे निरतिशय प्रेम जीवनगौरव पुरस्कार प्रदान सोहळ्यानंतर त्यांनी व्यक्त केलेल्या मनोगतातूनही दिसून आलं. गोव्यातील कला व संस्कृतीच्या परस्परसंबंधांचा अभ्यास होण्याची गरज त्यांनी कळकळीनं प्रतिपादन केलीच; पण त्यासाठी आवश्यक ते सर्व साहाय्य करण्याची तयारीही त्यांनी दर्शविली. गोव्यातील कलावंतांची माहिती इंग्रजी भाषेत ग्रथित होण्याची आवश्यकताही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

रात्रीच्या दुसऱ्या सत्रात पं. हृदयनाथ मंगेशकर आणि शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचा 'शिवकल्याणराजा' हा शिवरायांची गाथा कथन करणारा संगीतमय कार्यक्रम हे गोवेकरांसाठी मोठंच आकर्षण होतं. गोव्यातील कला व संस्कृतीबाबत तिथल्या राज्यकर्त्यांनाही किती आस्था आहे, याचं प्रत्यंतर मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या भाषणातून आलं. गोव्यातील कलाकार गोव्यातच मोठा व्हायला हवा, त्यासाठी त्याला गोव्याबाहेर जायची गरज पडू नसे, ही त्यांनी व्यक्त केलेली कळकळ सच्ची होती. ती नुसतीच बोलघेवडी नाहीए, तर त्यासाठी गोवा सरकार सर्वतोपरी झटते आहे, हे रंगसंमेलनाचे तीन दिवस गोवा कला अकादमीत वावरताना सार्थपणे पटलंही!

गोंयचे लोक वृत्तीनं आणि प्रवृत्तीनंही सुशेगात. त्यामुळे चतुरंगची शिस्त आणि मेहनत गोव्यातील चतुरंगच्या नव्या कार्यकर्त्यांना कितपत मानवेल, अशी धाकधुक सुरुवातीला वाटत होती. परंतु रंगसंमेलनात गोव्यातले चतुरंगी कार्यकर्तेही मुंबईच्या कार्यकर्त्यांच्या जोडीनंच मान मोडून काम करत होते. त्यांना एवढ्या कडव्या शिस्तीची सवय नसली तरी गोव्यात चतुरंगची शाखा काढायची असेल तर मेहनतीची सवय करण्यावाचून त्यांच्यासमोर दुसरा पर्यायही नाही. कुमार सरज्योतिषी, परेश जोशी प्रभृतींना याची पूर्णपणे जाणीव आहे. आणि या कसोटीला उतरायचा त्यांचा निर्धारही त्यांच्या बोलण्यातून जाणवत होता. या रंगसंमेलनाची ही फलश्रुती म्हणायला हरकत नसावी.

**रवींद्र पाथरे**